# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.05.2025** **वार-मंगळवार**

---

**मिळकत कर**

यांसाच्या आर्थिक वर्षात पुणे महापालिकेच्या मिळकत करात 40 टक्के सवलत मिळाली नसल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. मात्र कोणावरही अन्याय होऊ देणार नाही असं पुणे महापालिकेचे उपायुक्त आणि मिळकतकर विभागाचे प्रमुख अविनाश सपकाळ यांनी म्हटलं आहे. नागरिक स्वतः रहात असलेल्या सदनिकांनाही 40 टक्के सवलत मिळाली नसल्याच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे येत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वास्तव्याचा पुरावा आणि पिटी थ्री अर्ज पुन्हा जमा करावा असं सपकाळ यांनी सांगितलं.

**ससून**

ससून सर्वोपचार रुग्णालयात वैद्यकीय आपत्कालीन स्थितीत उपचार करण्यासाठी जुलै 2023 मध्ये ‘कोड ब्ल्यू’ यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. ही यंत्रणा सुरू करणारं ससून हे राज्यातलं पहिलं सरकारी रुग्णालय ठरलं होतं. या यंत्रणेमुळे वैद्यकीय आपत्कालीन स्थितीत केवळ 120 सेकंदांत रुग्णाला उपचार मिळत आहेत. ससूनमध्ये कोड ब्ल्यू’ यंत्रणा सुरू झाल्यापासून म्हणजे जुलै 2023 ते मे 2025 या कालावधीत 4396 रुग्णांवर आपत्कालीन स्थितीत उपचार करण्यात आले. त्यातील 50 टक्के रुग्ण श्वास घेण्यास त्रास होणारे आणि 15 टक्के रुग्ण हे हृदयक्रिया बंद पडलेले होते. या रुग्णांना वाचविण्यात यश आले. मात्र, आपत्कालीन उपचार करूनही 30 ते 35 टक्के रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्या रुग्णांना सहव्याधी आणि कर्करोगासह इतर गंभीर आजार झाले होते, अशी माहिती ससून रुग्णालयाच्या प्रशासनाने दिली.

**पाऊस नुकसान**

पुणे शहरासह जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे दोन हजार हेक्टर क्षेत्रावरील शेतपिकांना फटका बसला आहे. कांदा, आंबा, काजू, केळी, भुईमूग, बाजरी, भाजीपाला पावसामुळे वाहून गेला आहेल तसंच काढणीला आलेला कांदा आणि बाजरीचंही नुकसान झालं आहे. मे महिन्यात जिल्ह्यात सुमारे

अडीच हजार हेक्टरवरील शेतीपिकाचे नुकसान झाल्याचा महसूल प्रशासनाचा प्राथमिक अंदाज आहे. दरम्यान, गेल्या पंधरा दिवसांपासून सातत्याने पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांची पेरणीपूर्व कामं खोळंबली आहेत.

**रस्ते**
पुणे शहराच्या विविध भागातील रस्त्यावर पडणारे खड्डे बुजविण्यासाठी पुणे महापालिकेने क्षेत्रीय कार्यालयनिहाय दुरुस्ती वाहनं सज्ज ठेवली आहेत, अशी माहिती महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी आज पत्रकारांना दिली. गेले चार दिवस शहरात होत असलेल्या मुसळधार पावसाने रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. यामुळे अपघात होण्याचा धोकाही वाढला आहे. या पार्श्वभूमीवर रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात येत असून खड्डे बुजविण्यासाठी कोल्डमिक्स आणि चांगल्या दर्जाचे घटक वापरले जाणार आहेत.

**pcmc**
केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे  सहसचिव  संकेत भोंडवे यांच्या नेतृत्वाखाली सनदी अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला भेट दिली. प्रशासकीय कामांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर नागरी सेवा सुलभीकरणाला गती देईल असं संकेत भोंडवे यांनी यावेळी सांगितलं. पिंपरी चिंचवड महापालिकेकडून प्रशासकीय कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर उत्तम पद्धतीने केला जात असल्याचं विविध प्रकल्पांवरून दिसून येत आहे. यामुळे महापालिकेचं कामकाज गतीने, लोकाभिमूख होत असून महापालिकेच्या उत्पन्नात देखील वाढ होत असल्याचं भोंडवे म्हणाले.

**पुरस्कार**
प्रसाद प्रकाशनातर्फे येत्या शनिवारी पुण्यात पुरस्कार वितरण आणि ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी ज्येष्ठ कवयित्री आणि माजी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे आणि ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

**मसाप**
राजशिष्टाचारात प्रस्थापित झालेले राजकारणी आपआपल्या जातीधर्मापुढे जाऊ इच्छित नाहीत ही शोकांतिका आहे, अशी खंत व्यक्त करत महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणायची लाज वाटते, असे उद्विग्न उद्गार ज्येष्ठ  लेखक, लक्ष्मण गायकवाड यांनी आज पुण्यात काढले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 120व्या वर्धापन दिनानिमित्त लेखक सन्मान तसंच शाखा आणि कार्यकर्ता पुरस्कार

वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी गायकवाड यांचा महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जीवन गौरव पुरस्काने सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

**गोवंश संरक्षण**
आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर राज्यात जनावरांची अवैध वाहतूक आणि बेकायदा कत्तल रोखण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाने कठोर निर्देश जारी केले आहेत. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1995 आणि त्यातील सुधारणा तसंच गोवंश हत्याबंदी कायद्याचं प्रभावी पालन करण्याचं आवाहन आयोगाने केलं आहे.

**श्रद्धांजली**
पिंपरी चिंचवड महापालिका आणि शहरातील विज्ञान प्रेमींच्या वतीने ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर यांना काल श्रद्धांजली वाहण्यात आली. सायन्स पार्कमध्ये तारांगण परिसरात ही श्रद्धांजली सभा झाली. पिंपरी चिंचवड शहरात विज्ञान भवन उभारण्याचा नारळीकर यांचा मानस होता. त्यातूनच तारांगणची उभारणी झाली आहे.

**हवामान**
पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर अधून मधून पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. आज कमाल तापमान 27 तर किमान तापमान 21 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही दिवसभर ढगाळ हवामानासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**